# 'स्वरसंध्या-२०१९' सांगीतिक कार्यक्रमात रसिक मंत्रमुग्ध

**पणजी** : बिट्स पिलानी गोवा कॅम्पस येथील मुख्य प्रेक्षागृहात नुकताच 'स्वरसंध्या-२०१९' हा कार्यक्रम पार पडला. या सांगीतिक कार्यक्रमाचे हे तिसरे वर्ष होते. कार्यक्रमात कॅम्पसमधील विद्यार्थ्यांनी मराठी संस्कृतीचे विविध पैलू उलगडताना भक्तिगीते, अभंग, नाट्यगीत, चित्रपटगीत, लोकसंगीत अशा एकापेक्षा एक सुंदर कलाकृती सादर केल्या.

त्यांनी गायिलेल्या वंद्य वंदे मातरम्, पंचतुंड नररुंडमालधर, मागे उभा मंगेश, मुरलीधर श्याम, माझे माहेर पंढरी, लंगडा ग लंगडा, हरी म्हणा कुणी, वाजले कि बारा आदी गीतांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. याशिवाय, या कार्यक्रमादरम्यान सादर करण्यात आलेल्या काही अजरामर हिंदी गीतांच्या 'गीतमालिकेला' सुद्धा रसिकांनी भरभरून आणि उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाची सांगता 'चिन्मया सकल हृदया' या हृदयस्पर्शी भैरवीने झाली. महाविद्यालयातील विद्यार्थी गायक सुकृत ताम्हणकर, रेश्मा झाकणे, मोहित सवाने, अनुष्का गबाळे, प्रांजली रानडे यांनी सादर केलेल्या विविध गीतांना, योगेन बोरकर(संवादिनी), वरद चिपळूणकर(संवादिनी), शुभांकर काटे(बासरी), सिद्धार्थ मिश्र(तबला), अमेय पटवर्धन (तबला), प्रणव पवार(ढोलकी), ह्रिषिक सागर(सिंथेसायझर), रजत तिरोडकर (पखवाज) यांनी उत्कृष्ट अशी साथसंगत करून कॅम्पसमधील तसेच गोमंतकीय रसिकांची दाद मिळविली. प्रा. डॉ. सचिन वायगावकर, शर्वरी कुलकर्णी यांनी अतिशय अभ्यासपूर्ण आणि खुमासदार पद्धतीने निवेदन करून कार्यक्रमाची रंगत आणखी वाढविली.

Thu, 31 October 2019
epaper.thegoan.net/c/45396839